# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधिक्षक,
गडचिरोली, दिनांक ११/८/२०१८

मा. पोलीस अधिक्षक, गडचिरोली श्री. शैलेश बलकवडे सा., मा. अपर पोलीस अधिक्षक गडचिरोली श्री. महेंद्र पंडित सा. यांचे आदेशान्वये स्थानिक गुन्हे शाखा, गडचिरोली चे पोलीस निरीक्षक प्रदिप चौगावकर यांचे मार्गदर्शखाली स्थानिक गुन्हे शाखा येथील पोउपनि भागवत कदम व त्यांचे पथकाने मिळालेल्या गोपनिय बातमीच्या आधारे सापळा रचुन आरोपी कार्तिक अरुणराव पराड, वय ३३ वर्ष, रा. गडचिरोली यास मारोती सुझुकी कंपणीचे स्विफ्ट डिझायर चारचाकी वाहन क्रमांक एम.एच ४०/ ए.आर. ७९०७ मधुन अवैध दारुची वाहतुक करतांना देसाईगंज ते आरमोरी रोडवर मोठया शिताफीने पकडले. यावेळी केलेल्या कारवाईत देशी दारु सुपर सॉनीक रॉकेट संत्रा कंपणीच्या दारुचे २५ बॉक्स मधील एकुन २५०० सिलंबद निपा अंदाजे किंमत १,७५,०००/- रुपये व दारु वाहतुकी करीता वापरलेले स्विफ्ट डिझायर चारचाकी वाहन अंदाजे किंमत ५,२५,०००/- रुपये असा एकुण ७,००,०००/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी कार्तिक पराड यास ताब्यात घेवून त्याचे व पाहिजे आरोपी स्वप्नील वानखेडे रा. गडचिरोली यांचे विरुध्द पोलीस स्टेशन आरमोरी येथे अपराध क्रमांक २००/२०१८ कलम ६५(अ),८३, ९८ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा/५४६ रामदास जायभाय हे करीत आहेत.

गडचिरोली जिल्हयात दारुबंदी असल्याकारणाने जर कोणी दारुचे उत्पादन, वाहतुक किंवा विक्री करीत असेल तर अशा इसमांची माहिती तात्काळ ०७१३२-२२३१७४ या क्रमांकावर दयावी. अशा इसमांविरुध्द प्रभावी कारवाई करण्यात येईल असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक श्री शैलेश बलकवडे सा. यांनी केले आहे.